
॥ श्री ॥

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे


कार्यालय : ५७६ गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२ फोन ४३४३४०
उपकार्यालय : ४९७, ४९९, ५०० घोरपडे पेठ, पुणे ४११ ०४२.



# वार्षिक अहवाल

## सन १९९२-९३


## • कार्यकारिणी व विश्वस्त मंडळ पदाधिकारी •




डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल
अध्यक्ष




श्री. गजाननसा अर्जुनसा शालगर
उपाध्यक्ष



श्री. अशोकसा ल. रंगापुरे
कार्यवाह



श्री. हेमंत चं. खेरूड
उपकार्यवाह



श्री. प्रभाकरसा ज. बाकळे
खजिनदार

## • कार्यकारिणी सदस्य •




श्री. पुरुषोत्तमसा वा. चावंडे
हिशोब तपासनीस




श्री. राजेंद्रसा द. हबीब




श्री. प्रविण रा. दामजी



श्री. शंकरसा रे. दाणी



श्री. गोपाळसा ग. चव्हाण



श्री. विजय शं. हदगल

श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे
५७६ गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२.

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

आपल्या समाज संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक ११.१०.१९९३ रोजी सकाळी ९.०० वा. ''टिळक स्मारक मंदिर'' येथे होणार आहे. तरी समाजाच्या सर्व सभासद बंधु-भगिनींनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

## ● सभेपुढील विषय ●

१. मागील दि. २७.०७.१९९२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२. १.०४.१९९२ ते ३१.०३.१९९३ चा अहवाल व ताळेबंद मंजूर करणे.

३. घटनेतील काही कलमांची दुरुस्ती. (दुरुस्तीचे परिशिष्ट सोबत जोडले आहे.)

४. स्वारगेट येथील वास्तूतील श्री मारुती मंदिर, श्री दशमुखी देवी मंदिर व श्री विष्णु मंदिर या तिन्ही मंदिरातील देवतांची एकाच ठिकाणी संयुक्तिक प्रतिष्ठापना करणे (जेणे करून या वास्तूत समाजाचा एकच भव्य प्रकल्प उभा करणे सोयीचे ठरेल.)

५. स्वारगेट येथील वास्तूत समाजाच्या भव्य प्रकल्पास मंजूरी घेणे. (अहवाल पुस्तिकेच्या पुढील भागात याची सविस्तर माहिती दिलेली आहे.)

६. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

| | |
|---|---|
| श्री. अशोकसा ल. रंगापुरे | डॉ. प्रकाश भु. त्रिमल |
| *कार्यवाह* | *अध्यक्ष* |
| श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे | श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे |

श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

# वार्षिक अहवाल : सन १९९२-९३

सन्माननीय समाज बंधू-भगिनींनो

२१ वर्षांच्या अनियमित कालावधीनंतर व गेल्या वर्षी एकदमच सादर केल्या गेलेल्या १५ वर्षांच्या अहवालांच्या पार्श्वभूमिवर या वर्षीचा हा अहवाल कार्यकारिणीच्या वतीने सादर करण्यास आम्हाला आनंद होत आहे. १७ ऑगस्ट १९९२ रोजी २१ वर्षांच्या कालावधीनंतर प्रथमच आपल्या समाजाची निवडणूक होऊन बहुमताने सध्याची कार्यकारिणी निवडली गेली. १८ ऑगस्ट १९९२ च्या अभिनंदनाच्या सभेनंतर २४ ऑगस्ट १९९२ रोजी कार्यकारिणीने ट्रस्टच्या कार्याचा व कार्यालयाचा ताबा घेतला.

१९७१ नंतर एकही निवडणूक न झाल्यामुळे आणि १५ वर्षांच्या एकहाती कारभारामुळे पुणे समाजाचे अखिल भारतीय अथवा महाराष्ट्र पातळीवर फारसे स्थान उरले नव्हते. निवडणूका घ्याव्यात, लोकशाही मार्गाने निवडून आलेली कार्यकारिणी अस्तित्वात यावी, पुणे समाजाची प्रगती व्हावी व पुणे समाजाबद्दल असलेले उपहासाचे वातावरण संपावे यासाठी पुण्यातील समाज बांधव – श्री. अशोकसा रंगापुरे, श्री. हिरासा बिद्री, श्री. चंद्रकांतसा शालगर, श्री. शंकरसा दाणी, श्री. राजेंद्रसा हबीब, श्री. गजाननसा शालगर, श्री. संदीप चव्हाण, श्री. हेमंत खेरूड, श्री. उल्हाससा त्रिमल यांनी व युवक संघटनेने बरीच वर्षे निकराचे प्रयत्न केले. एक वेळ तर अशी आली होती की या स्थितीत काहीच बदल होऊ शकणार नाही असे पुण्यातील समाज बंधु-भगिनींना, महाराष्ट्र प्रांतीय सभेच्या पदाधिकाऱ्यांना व इतर ग्रामसभांना वाटत होते. परंतु वरील समाज बांधवांच्या प्रयत्नांना यश येऊन २५ जानेवारी १९९२ रोजी समाज बांधवांची एक सभा होऊन त्या सभेत एक ॲडहॉक कमिटी (अस्थायी समिती) नेमली गेली.

## ● ॲडहॉक कमिटी ●

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल | – अध्यक्ष |
| २. | श्री. संदीप मोतीलालसा चव्हाण | – सेक्रेटरी |
| ३. | श्री. दत्तुसा विठ्ठलसा वाळवेकर | – सभासद |
| ४. | श्री. विठ्ठलसा गोविंदसा कमलापुरे | – सभासद |
| ५. | श्री. अशोकसा लक्ष्मणसा रंगापुरे | – सभासद |
| ६. | श्री. स्नेहकांतसा नरसिंगसा बद्दी | – सभासद |
| ७. | श्री. चंद्रकांतसा नानासा शालगर | – सभासद |
| ८. | श्री. राजेंद्रसा दत्तुसा हबीब | – सभासद |
| ९. | श्री. श्रीकांत शंकरसा शालगर | – सभासद |
| १०. | श्री. प्रवीण रामचंद्रसा दामजी | – सभासद |
| ११. | श्री. हेमंत चंद्रकांतसा खेरुड | – सभासद |

**सभासदांना विनंती**

१. गणसंख्येअभावी सभा न घेता आल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. अहवालामधील मजकूरासंबंधी व ताळेबंदासंबंधी कोणा सभासदास काही कागदपत्रे पहावयाची असल्यास त्यांनी दि.०८.१०.९३ व ०९.१०.९३ रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत तशा लेखी अर्जासह संस्थेच्या मुख्य कार्यालयात (५७६, गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२.) उपस्थित रहावे.

३. सभेस येताना अहवालाची ही प्रत घेऊन येणे.

४. सर्वसाधारण सभेत कोणा सभासदास काही सूचना मांडावयाच्या असल्यास त्या सूचनांसह तसा लेखी अर्ज संस्थेच्या मुख्य कार्यालयात बुधवार दिनांक ०६.१०.९३ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.३० ते १०.३० व सायंकाळी ६.३० ते ७.३०) दोन प्रती आणून देऊन एका प्रतीवर पोच घेणे. ट्रस्ट कार्यासंबंधीच्या सूचनांचाच यात फक्त विचार केला जाईल. कोणत्याही वैयक्तिक सूचनांचा विचार केला जाणार नाही. दि. ०६.१०.९३ नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. वरील लेखी अर्ज दिलेल्या व कार्यकारिणीने संमत केलेल्या सभासदांनाच सर्वसाधारण सभेत बोलण्याची परवानगी असेल. सदरील विषयासंबंधीच चर्चा होईल.

५. कृपया या सभेस लहान मुलांना आणू नये. त्याचप्रमाणे समाजहिताचेच प्रश्न मांडून व त्यावरच चर्चा करून सहकार्य करावे.

या ॲडहॉक कमिटीकडे खालील कामे सोपविली गेली होती.

१. जनगणना करणे व सभासद नोंदणी करणे.
२. दुरुस्त्या करून घटना अद्ययावत करणे.
३. निवडणूक प्रक्रिया चालू करणे.

या कमिटीने ६ महिने नियमित बैठका घेतल्या, अस्तित्वात असलेल्या घटनेचा सर्वांगाने विचार केला, सखोल चर्चा केली व अद्ययावत घटना तयार केली. ती दि. १.६.१९९२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत बहुमताने मंजूर झाली.

पुणे शहर व परिसरातील जवळजवळ प्रत्येक समाज बांधवांच्या घरी जाऊन या कार्यकारिणीच्या सदस्य असलेल्या समाज बांधवांनी जनगणना केली व सभासद नोंदणी केली. एकूण नोंदणी झालेल्या सभासदांची संख्या २,३०८ झाली.

दि. २७.७.९२ रोजी आधीच्या ट्रस्टींनी बोलविलेल्या सर्व साधारण सभेत सदरील जनगणना व केलेली सभासद नोंदणी सभेपुढे मांडण्यात आली. त्याचप्रमाणे निवडणुकीची मागणी केली. सभासदांच्या बहुमताच्या दबावामुळे माजी अध्यक्ष श्री. दत्तुसा विठ्ठलसा वाळवेकर यांनी १७ ऑगस्ट ९२ ही निवडणुकीची तारीख जाहीर केली. या सभेत माजी अध्यक्षांनी १५ वर्षांचा अहवाल एकदमच सादर केला. खरे तर घटनेप्रमाणे दरवर्षी सर्वसाधारण सभा भरवणे आवश्यक असते. १५ वर्षांचा अहवाल १९९२ साली एकदमच सादर करण्याऐवजी माजी ट्रस्टींनी दरवर्षी सर्वसाधारण सभा का घेतली नाही? दरवर्षी हिशोब का सादर केले नाहीत? दरवर्षीच्या कार्याचा आढावा समाजबांधवांपुढे का मांडला नाही? घटनेप्रमाणे नियमितपणे निवडणुका का घेतल्या नाहीत? १९७७ साली कोर्टाच्या आदेशाप्रमाणे १९७१ साली झालेली निवडणुक बेकायदेशीर ठरवली गेली. परंतु त्याच कोर्टाच्या आदेशाप्रमाणे त्वरीत निवडणुका घेऊन ट्रस्टची नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येणे आवश्यक होते. माजी अध्यक्ष श्री. दत्तुसा विठ्ठलसा वाळवेकर, माजी कार्यवाह श्री. रमाकांतसा शंकरसा खोडे व इतर ट्रस्टी यांनी १९७७ सालापासून ट्रस्टचा कारभार चालविला. ट्रस्टचा कारभार कोणत्या नियमानुसार त्यांनी हाती घेतला? कोर्टाच्या आदेशाचे पालन करून त्वरीत निवडणुका का घेतल्या नाहीत? ट्रस्टचा कारभार हाती घेतल्यानंतर माजी ट्रस्टींनी सर्व साधारण सभेची संमती तरी घेतली का? या कालावधीत झालेल्या ट्रस्टच्या पिछेहाटीस जबाबदार कोण? घटनेचे कधीही पालन न करता, सर्वसाधारण सभेची संमती न घेता तसेच समाज बांधवांना कधीही विश्वासात न घेता एकाधिकारशाही पद्धतीने वागण्याची प्रवृत्ती का तयार झाली? हे व इतर अनेक प्रश्न आपल्यापुढे व या कार्यकारिणीपुढे होते व आहेत. याच प्रश्नांचा पाठपुरावा करीत बसलो असतो तर या एक वर्षाच्या कालावधीत जे काही थोडेफार कार्य साध्य करता आले ते देखील शक्य झाले नसते. त्यामुळे या कार्यकारिणीने दि. २७.७.९२ च्या सर्वसाधारण सभेत संमत झालेल्या खालील एका ठरावाची अंमलबजावणी आता करण्याचे ठरविले आहे. तो ठराव असा,

*"१९७७ ते ऑगस्ट १९९२ या कालावधीत अध्यक्ष श्री. दत्तुसा विठ्ठलसा वाळवेकर व कार्यवाह श्री. रमाकांतसा शंकरसा खोडे, यांनी संस्थेचा कारभार पाहिला. या कालावधीत*

*जर काही आर्थिक वा इतर गैरव्यवहार झाले असतील तर नवीन निवडून येणाऱ्या कार्यकारिणीने त्यांची चौकशी करावी व दोषी व्यक्तिंवर कारवाई करावी.''*

या ठरावाची पूर्तता करण्यासाठी या कार्यकारिणीने कार्यकारिणीच्याच सभासदांची एक चौकशीसमिती नेमली आहे ती पुढीलप्रमाणे :

## ● चौकशी समिती ●

१. डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल – अध्यक्ष
२. श्री. गजानन अर्जुनसा शालगर – सभासद
३. श्री. अशोकसा लक्ष्मणसा रंगापुरे – सभासद
४. श्री. प्रभाकरसा जनार्दनसा बाकळे – सभासद
५. श्री. हेमंत चंद्रकातसा खेरुड – सभासद

लवकरच या समितीच्या कामकाजास सुरुवात होईल.

या कार्यकारिणीने कार्यच्या सुरवातीलाच शिक्षणमंडळाची नेमणूक केली, ती पुढीलप्रमाणे :

## ● शिक्षण मंडळ ●

१. श्री. संदिप मोतीलालसा चव्हाण – अध्यक्ष
२. श्री. प्रभाकरसा सुर्यासा आरसिद्ध – कार्यवाह
३. श्री. स्नेहकांतसा नरसिंगसा बद्दी – सदस्य
४. श्री. मोतीलालसा सिद्रामसा कोल्हापुरे – सदस्य
५. श्री. चंद्रकांतसा नानासा शालगर – सदस्य

या वर्षीचे शिक्षण मंडळाचे कार्य :

१. १ली ते टी.वाय्. पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रमाच्या सुमारे ३०० विद्यार्थ्यांना मोफत पुस्तक वाटप.

२. १ ली ते १० वी च्या सुमारे १०० गरजू विद्यार्थी-विद्यार्थीनींना मोफत वह्या वाटप, गणवेश वाटप व शालेय वस्तुंचे वाटप.

३. १५ ऑगस्ट १९९३ रोजी १ ली ते टी.वाय्. च्या व पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रमाच्या हुषार विद्यार्थ्यांना **श्रीमती सुभद्रा अ. शालगर** यांचे हस्ते पारितोषिक वितरण.

**नम्र निवेदन :** शिक्षण मंडळाने गरजु विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी 'शिक्षण निधी' उभारण्याची योजना आखली आहे. या योजनेअंतर्गत समाज बांधवांनी प्रत्येकी ५०० रुपये देऊन शिक्षण मंडळाचे 'आजीवन सभासद' व्हावे ही विनंती.

**ग्रंथालय :** आपल्या समाजाच्या ६२ गंज पेठ येथील कार्यालयात अल्प फी मध्ये शैक्षणिक, धार्मिक व करमणुक प्रधान वाचनीय पुस्तके समाज बांधवांसाठी उपलब्ध आहेत.

तरी या ग्रंथालयाचा समाज बांधवांनी जरूर लाभ घ्यावा.

सभासद शुल्क रु.२५/- अनामत

रु. ५/- दरमहा शुल्क

त्याचप्रमाणे कार्यकारिणीने वधु-वर सूचक मंडळाची नेमणूक केली. ती पुढील प्रमाणे :

## ● वधु-वर सूचक मंडळ ●

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गजाननसा दत्तुसा हबीब | – | अध्यक्ष |
| २. | श्री. राजन दौलतरामसा चव्हाण | – | सदस्य |
| ३. | श्री. वसंतसा नाकोड | – | सदस्य |

- वधुवर-सूचक मंडळात ज्या समाज बांधवांना कार्य करण्याची इच्छा असेल त्यांनी अध्यक्ष श्री. गजाननसा दत्तुसा हबीब यांच्याशी संपर्क साधावा.
- २६ जानेवारी १९९३ रोजी श्री सहस्रार्जुन सभागृहात कार्यकारिणीने समाज भगिनींची सभा आयोजित केली होती. त्यात बहुमताने महिला मंडळाची निवड करण्यात आली.

## ● महिला मंडळाची कार्यकारिणी ●

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. प्रमिला वामनसा पवार | – | अध्यक्ष |
| २. | सौ. रेखा प्रदिपसा कबाडे | – | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. पुष्पा नंदकुमारसा पवार | – | कार्यवाह |
| ४. | सौ. वंदना प्रभाकरसा आरसिद्ध | – | उप-कार्यवाह |
| ५. | सौ. शरयु गजाननसा हबीब | – | खजिनदार |
| ६. | सौ. अन्नपूर्णा प्रभाकरसा बाकळे | – | सभासद |
| ७. | सौ. पुष्पा उल्हाससा त्रिमल | – | सभासद |
| ८. | सौ. मंदा कृष्णाथसा चव्हाण | – | सभासद |
| ९. | सौ. निलिमा राजनसा पवार | – | सभासद |
| १०. | सौ. ललिता पुरुषोत्तमसा चावंडे | – | सभासद |
| ११. | सौ. देविका प्रफुल्ल कुक्कर | – | सभासद |

स्थापनेपासूनच महिला मंडळाने जोमाने कार्यास सुरुवात केली. खालील उपक्रम व उत्सव महिला मंडळाने अंमलात आणले.

१. महिला मंडळ कार्यकारिणी सदस्य व इतर समाज-भगिनींनी मिरची पूड, मसाला तयार करून त्याची विक्री केली व महिला मंडळास उत्पन्न मिळवून दिले. सदरील महिला उद्योग व्यवस्थित चालू असून त्याची प्रगती होत आहे.

२. महिला मंडळाच्या सदस्यांनी स्वतः घरोघर फिरून अनेक महिला सदस्यांची नोंदणी केली.

३. स्वारगेट येथील सहस्त्रार्जुन भवनाच्या आवारात नागपंचमी सण विविध खेळांनी व उत्साहाने साजरा केला. त्यास समाज भगिनींची प्रचंड उपस्थिती होती. रामनवमी, गोकुळ अष्टमी या उत्सवांना महिला मंडळाने सहकार्य केले. सप्टेंबर महिन्यात एका खाजगी बसद्वारे महिला मंडळाच्या सभासदांनी सिंहगड व बनेश्वरची एक सहल आयोजित केली होती. लवकरच खाजगी बसद्वारे तिरुपती बालाजी व इतर काही प्रेक्षणिय स्थळांची सहल आयोजित करणार आहेत. भगिनींचा त्यास उत्तम प्रतिसाद मिळेल यात शंकाच नाही.

* * *

# ● कार्याचा आढावा ●

स्वारगेट येथील तिसऱ्या मजल्यावरील कार्यालय बऱ्याच वर्षापासून वापरात नव्हते. त्यातून संस्थेला फारसे उत्पन्न मिळत नव्हते. कार्यकारिणीने प्रथम सुसज्ज कार्यालय सुरु करण्याकडे लक्ष दिले. ही कार्यालयाची जागा अनेक वर्षे वापरात नसल्यामुळे व वेळीच लक्ष न दिल्याने बरीच नासधूस झालेली होती. ठिकठिकाणी छत गळत होते, रंग उडालेला होता. लाईट फिटींग नादुरुस्त होते. संडास-बाथरुम तुंबलेले होते. कार्यालयाच्या जागेशिवाय कार्यालयास लागणारी कोणतीही वस्तु तिथे नव्हती. त्या जागेचा समाज बांधवांना काहीही उपयोग होत नव्हता. उलट त्या जागेचा इतरांकडून फुकट गैरवापर केला जात होता. कार्यालयाप्रमाणेच कार्यालयाचे जिने व पॅसेज याचा गैरवापर केला जात होता. समाजाची एवढी प्रचंड मौल्यवान वास्तू एवढ्या मोक्याच्या जागी असूनही समाजाला त्याचा वापर करता येत नव्हता, किंवा त्यातून उत्पन्नही मिळत नव्हते.

● स्वारगेटच्या शुभकार्यालयात खालील सुधारणा केल्या.

१. दोन्ही बाजूंनी गळत असलेल्या छतांची दुरुस्ती केली.
२. सर्व लाईट फिटींग दुरुस्त करून घेतले.
३. संपूर्ण कार्यालयास व जिन्यास रंगरंगोटी केली.
४. शुभ कार्यासाठी लाकडी स्टेज बनवून घेतले. त्यावर हॅलोजन व लाईटमाळा सोडण्यात आल्या.
५. नवीन संतरंज्या व जेवण पंगतीला उपयोगी सतरंजी पट्ट्या घेतल्या.
६. लग्न कार्यासाठी सर्व सामान; उदाहरणार्थ – भांडी, गॅस शेगड्या, पाण्याचे पिंप, गाद्या–उश्या, सतरंज्या इत्यादींची कार्यालयात सोय केली.
७. वरील सर्व सामान ठेवण्याकरिता स्टोअरची सोय केली.
८. हात धुण्यासाठी सहा नळ असलेल्या वॉश बेसिनची सोय केली.
९. हॉलमध्ये स्टेजमागील भिंतीवर 'सहस्त्रार्जुन सभागृह' असे नांव रंगवून घेतले. त्याचप्रमाणे त्याखाली ट्रस्टकडे असलेली श्री सहस्त्रार्जुनची भव्य प्रतिमा लावण्यात आली.
१०. वायरमन कडून कायम स्वरुपी लाइटिंगची व स्पिकर सेटची सोय करण्यात आली.

अश्या तऱ्हेने कार्यालय सुसज्ज करून घेण्यात आले. स्वारगेटच्या मोकळया जागेवरील केरकचरा, दगड-विटा, श्रमदानाने काढून जागेचे सपाटीकरण करून घेतले. फुटलेल्या ड्रेनेज लाईन्स, ड्रेनेज चेंबर्स व पाण्याचे नळ बदलून दुरुस्ती केली. देवीच्या मंदिराजवळील नळाचा अयोग्य वापर होत असल्याने तो नळ व मोरी काढून तिथे फरशी टाकण्यात आली. अशा स्वच्छ मोकळया जमिनीवर मांडव घालून त्याचाही शुभकार्यासाठी उपयोग करून घेण्यात आला.

आम्हाला सांगण्यास आनंद होतो की, तिसऱ्या मजल्यावरील सुसज्ज कार्यालयांचा व जमिनीवरील मांडवाचा बऱ्याच समाज बांधवांनी व इतरांनी शुभकार्यासाठी उपयोग केला. अपुरे पाणी व इतर काही त्रुटी यात आहेत त्या लवकरच दूर केल्या जातील.

स्वारगेट येथील मोकळया जागेचा, संडास-बाथरुमचा, देवी मंदिराचा, तेथील हॉटेलच्या नोकरांकडून गैरवापर होत होता. त्याला आळा बसावा व परिसर बंदिस्त व्हावा म्हणून प्रवेशद्वाराजवळ मजबूत व प्रशस्त लोखंडी फाटक बसविण्यात आले. त्यामुळे वरील गैर प्रकाराला काही प्रमाणात आळा बसला.

तिन्ही मंदिरांच्या दक्षिणेच्या लाकडी पेट्या नादुरुस्त झाल्या होत्या. त्यातून दक्षिणेचे पैसे चोरीस जात होते. या तिन्ही देवळात मजबूत लोखंडी व स्थिर पेट्या कायम स्वरुपी बसविण्यात आल्या. त्यामुळे दक्षिणेच्या उत्पन्नात निश्चितच वाढ झाली आहे. श्री विष्णु मंदिर व श्री दशमुखी माता मंदिरांची गळणारी छतें दुरुस्त केली. सर्व मंदिरांची डागडूजी करून रंगकाम, लाईटफिटिंग इ. कामे केली. नामफलक लावले. श्री मारुती मंदिरातील बंदिस्त जाळी काढून डागडूजी करून व रंगकाम करून मंदिर सुशोभित व प्रशस्त करण्यात आले. आवारात स्ट्रीट लाईट बसविण्यात आली. स्वारगेट येथील तळमजल्यावरील एका अडगळीच्या खोलीची दुरुस्ती, रंगकाम, लाईट फिटिंग इ. करून त्याचे उपकार्यालयात रुपांतर केले. उपकार्यालयाचा नामफलक लावण्यात आला. सदरील उपकार्यालयाचे उद्‌घाटन खडक माळ पोलीस स्टेशनचे प्रमुख निरिक्षक श्री. शरद माने यांच्या हस्ते रविवार दि. २७ सप्टेंबर ९२ रोजी करण्यात आले. विशेषतः लग्नसराईत हे उपकार्यालय सकाळी ११ ते ५ या वेळेत उघडे ठेवण्यात येते.

संस्थेचे मुख्य कार्यालय ५७६ गुरुवार पेठ येथे आहे. या कार्यकारिणीने तिथे बऱ्याच सुधारणा केल्या. सर्व लाईट फिटींग दुरुस्त करून घेतली. अनेक वर्षे पडून असलेली व वाळवी लागलेली वह्या पुस्तकांची रद्दी विकून टाकली. सर्व कागद-पत्रांची छाननी करून त्यांचे व्यवस्थित वर्गीकरण केले व त्याप्रमाणे वेगवेगळया फाईल्स बनविल्या. या जागेचा देखील साखरपुडा, लग्नकार्य, बैठका इ. साठी वापर केला जातो. त्या करिता आवश्यक असलेली भांडी, गाद्या, सतरंज्या इ. सामान तिथे ठेवण्यात आले. त्यामुळे या छोट्या सुसज्ज कार्यालयाचा वापर वाढला.

या मुख्य कार्यालयाच्या इमारतीत खालील संस्थांचे काम चालते.

१. श्री सो. स. क्षत्रिय शिक्षण मंडळ
२. श्री सो. स. क्षत्रिय महिला मंडळ

३. श्री सो. स. क्षत्रिय वधु-वर सूचक मंडळ
४. श्री सहस्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था (म.)
५. श्री सो. स. क्षत्रिय युवक संघटना.

स्वारगेट येथील संस्थेच्या जागेतील बरेच भाडेकरू संस्थेच्या परिसराचा गैरवापर करतात. तसेच काही भाडेकरूंनी भाडेकराराचे उल्लंघन केलेले आहे. त्यापैकी गिरीधरलाल शर्मा यांनी किराणा दुकानाचे जागी कापडाचे दुकान व तेलाच्या दुकानाच्या जागी कापडाचे दुकान सुरू केले आहे. दुर्दैवाने आधीच्या ट्रस्टींनी या बाबतीत वकीलामार्फत नोटीस देण्याव्यतिरिक्त कसलीही कारवाई केलेली नाही. या जागांपैकी किराणा भुसार दुकानाच्या बाबतीत या कार्यकारिणीने कोर्टात केस दाखल केलेली आहे. इतर जागांबद्दलही कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. स्वारगेट येथील ट्रस्टच्या प्रवेश द्वाराजवळील लोखंडी फाटकालगत आधीपासूनच अनधिकृत खोके उभे राहण्यास आधीचे ट्रस्टी कारणीभूत आहेत. ते काढण्यासाठी देखील कोर्टात केस दाखल केली आहे.

स्वारगेट येथील इमारतीचा संपूर्ण दुसरा मजला ग्रामीण पोस्ट ऑफिसला दि.२६.७.१९७९ पासून भाड्याने देण्यात आलेला आहे. त्याचे भाडे दरमहा रु.३,७७५/- येते. ग्रामीण पोस्ट अधिकाऱ्यांनी दिनांक २९.४.८३ व ६.६.८५ या दोन्ही वेळा ५ वर्षांचा भाडेकरार करावा म्हणून ट्रस्टकडे आग्रह धरला. तसेच लिखाणाचे ड्राफ्टदेखील दोन्ही वेळा ट्रस्ट कडे सादर केले. आधीच्या ट्रस्टींनी त्याची दखल घेतली नाही. संधी चालून आली असताना भाडे करार केला नाही. जर असा करार केला असता तर कराराच्या ५ वर्षांच्या कालावधीनंतर ट्रस्टला भाडेवाढ करता आली असती. आज त्या जागेचे भाडे दर चौरस फुटास दरमहा साधारणतः ७ ते ८ रुपये आकारले जाते. या प्रमाणे जर नव्या करारान्वये भाडे वाढवून घेता आले असते तर सदरील २५०० चौरस फुटाच्या जागेचे भाडे दरमहा १५ ते १८ हजार रुपये आले असते. याचा अर्थ दरवर्षी त्या जागेच्या भाड्यापोटी ट्रस्टला दीडलाख रुपये जास्त मिळाले असते. संधी असताना आधीच्या ट्रस्टींनी करार न केल्यामुळे इतकी वर्षे ट्रस्टचे आर्थिक नुकसान झाले. सदरील ग्रामीण पोस्टाची जागा ताब्यात घेण्यासाठी कारवाई करण्यात येत आहे.

स्वारगेटच्या सहस्रार्जुन भवनाच्या मोकळ्या जागेत होर्डींगच्या (जाहीरातींचे मोठे बोर्ड) जागा जास्त भाडे देणाऱ्या एजन्सीला देण्यात आल्या. त्याद्वारे समाजाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली. एकूण ३१०० चौ. फुटांचे होर्डींग ३ वर्षांच्या कराराने भाड्याने देण्यात आले.

या कार्यकारिणीने संस्थेच्या आर्थिक उत्पन्नात भरीव वाढ व्हावी म्हणून विशिष्ट उपक्रमाद्वारे समाजबांधवां कडून तसेच इतर हितचिंतकांकडून देणग्या गोळा करण्याचे ठरविले व त्यानुसार कारवाई केल्यामुळे एकूण ३०,००० रुपयांच्या देणग्या मिळाल्या. या सर्व देणगीदारांची ही कार्यकारिणी ऋणी आहे. एकूण ७६ देणगीदारांकडून देणग्या मिळाल्या.

* * *

# कार्यकारिणीने घेतलेल्या बैठका, साजरे केलेले उपक्रम इ...

**१. नवरात्र उत्सव :** सालाबादप्रमाणे नवरात्र उत्सव साजरा केला. देवीची पुजा माननीय आमदार श्री. प्रकाशजी ढेरे यांच्या हस्ते व मनपा शिक्षण मंडळ सदस्य माननीय श्री. अजितदादा दरेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

या वर्षीचा नवरात्रीचा ''रौप्यमहोत्सवी'' उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला आहे. सर्व समाज बंधु-भगिनींनी या कार्यक्रमात सहभागी होऊन लाभ घ्यावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

**२. कोजागिरी पौर्णिमा :** प्रथमच स्वारगेट येथील सहस्रार्जुन भवनात कोजागिरी पौर्णिमा साजरी केली. त्यास समाज बंधु-भगिनींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

**३. श्री सहस्रार्जुन जयंती :** बऱ्याच वर्षांच्या कालावधीनंतर श्री सहस्रार्जुन प्रतिमेची भव्य मिरवणूक आयोजित करण्यात आली. श्री सहस्रार्जुनचा सुसज्ज रथ, नगारा, बँड, ५ घोडेस्वार व समाज बंधु-भगिनींची प्रचंड उपस्थिती यांच्यासह ही मिरवणूक उत्तम पोलीस बंदोबस्तात ६२ गंज कार्यालयातून स्वारगेट येथील वास्तू पर्यंत नेण्यात आली. या मिरवणूकीत समाज-बंधु-भगिनींचा उत्साह ओसंडून वहात होता. अतिशय आनंदाने, उत्साहाने व शिस्तीने ही मिरवणूक पार पडली.

श्री सहस्रार्जुन जयंती निमित्त स्वारगेट येथील जागेत आयोजित केलेल्या भोजनास समाज बांधवांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. जवळजवळ ३००० (तीन हजार) समाज बंधू-भगिनींनी याचा लाभ घेतला. या कार्यक्रमास प्रथमच एवढे लोक उपस्थित राहिले. त्याचप्रमाणे जेवणाच्या पंगती कसलाही गोंधळ न होता अतिशय शिस्तिने व समाधानाने पार पडल्या.

**४. महाराष्ट्र प्रांतीय सभेची १० वी बैठक :** पुणे समाजास महाराष्ट्र पातळीवर महत्वाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी महाराष्ट्र प्रांतीय सभेची १० वी बैठक स्वारगेट येथील सहस्रार्जुन सभागृहात दि. २७ व २८ डिसेंबर १९९२ रोजी आयोजित करण्यात आली. ही प्रांतीय बैठक अतिशय व्यवस्थित पार पडली. बैठकीस उपस्थित असलेल्या महाराष्टातील ग्रामसभांच्या प्रतिनिधींनी उत्कृष्ट व शिस्तबद्ध आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. या बैठकीने प्रतिनिधींच्या उपस्थितीचा उच्चांक मोडला. महाराष्ट्रातील १९ ग्रामसेभांचे ५४ प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते.

- महाराष्ट्र प्रांतीय सभेवर पुणे समाजाचे प्रतिनिधी म्हणून

  १. श्री. डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल  २. श्री. गजानन अर्जुनसा शालगर
  ३. श्री. राजेंद्र दत्तुसा हबीब  ४. श्री. उल्हास भुजंगसा त्रिमल

यांची नेमणूक झाली. अशा तऱ्हेने महाराष्ट्र प्रांतीय सभेवर पुणे समाजास समाधानकारक प्रतिनिधीत्व मिळाले.

**५. २६ जानेवारी :** स्वारगेट येथील सहस्रार्जुन भवनाच्या आवारात कार्याकारिणीने व समाजबांधवांनी प्रथमच २६ जानेवारीचे झेंडावंदन केले.

**६. रंगपंचमी :** दि. १२ मार्च १९९३ रोजी सहस्रार्जुन भवनाच्या आवारात समाज बांधवांसाठी प्रथमच उत्साहाने रंगपंचमी साजरी करण्यात आली.

**७. श्री रामनवमी :** दि. १ एप्रिल ९३ रोजी स्वारगेट येथील श्री विष्णु मंदिरात महिला मंडळाच्या सहाय्याने श्री रामनवमी साजरी करण्यात आली.

**८. श्री हनुमान जयंती :** दि. ६ एप्रिल १९९३ रोजी स्वारगेट येथील श्री मारुती मंदिरात दरवर्षी प्रमाणे हनुमान जयंती साजरी करण्यात आली.

**९. गोकुळ अष्टमी :** १९ ऑगस्ट १९९३ रोजी स्वारगेट येथील श्री विष्णु मंदिरात महिला मंडळाच्या सहाय्याने गोकुळ अष्टमी साजरी करण्यात आली.

**१०. १५ ऑगस्ट :** स्वारगेट येथील सहस्रार्जुन भवनाच्या आवारात प्रथमच १५ ऑगस्टचे झेंडावंदन करण्यात आले.

**११. कार्यकारिणी व ट्रस्टच्या सर्व उपसंस्थांची एकत्र बैठक :** दि. १७ ऑगस्ट १९९३ रोजी सहस्रार्जुन सभागृहात कार्यकारिणीची व सर्व उपसंस्थांची एकत्र बैंठक घेण्यात आली. या बैठकीचा उद्देश असा की सर्व उपसंस्थांचा एकमेकांशी सौहार्दपूर्ण सुसंवाद असावा, कार्यात सुसूत्रीकरण असावे व समाजाच्या प्रगतीला चालना मिळावी. सदरील बैठकीस ट्रस्टच्या कार्यकारिणीसह खालील उपसंस्थांचे पदाधिकारी हजर होते.

१. श्री सो. स. क्षत्रिय समाज शिक्षण मंडळ
२. श्री सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळ
३. श्री सो. स. क्षत्रिय समाज वधू-वर सूचक मंडळ
४. श्री सहस्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था (म.)
५. श्री सो. स. क्षत्रिय समाज युवक संघटना.

**१२.** अखिल भारतीय श्री सो. स. क्षत्रिय समाज, बेंगलोरच्या सेंट्रल मॅनेजिंग कमिटीची बैठक दि. ५ जून १९९३ व दि. ६ जून १९९३ रोजी बेंगलोर येथे झाली. त्या बैठकीस पुण्याचे नेमणूक केलेले अधिकृत प्रतिनिधी

१. डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल     २. श्री शंकरसा वाळवेकर

हे हजर होते. या बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून खालील मान्यवरांची निवड झाली.

१. श्री. उल्हास भुजंगसा त्रिमल
२. श्री. स्नेहकांतसा नरसिंगसा बद्दी
३. श्री. रत्नाकरसा हिरालालसा झाड

पुणे ग्रामसभेला प्रथमच आपले विचार योग्य प्रतिनिधींद्वारे केंद्रीय समितीसमोर मांडता आले.

* * *

# मागील १५ वर्षांच्या
# व
# या वर्षाच्या कालाचा तुलनात्मक आढावा

## १. कार्यालयीन कागद पत्रांचे वर्गीकरण

१९५७ पासूनच्या फाईलींची व कागद पत्रांची पहाणी करून अनावश्यक कागदपत्रे काढून टाकली. फाईलींचे व कागदपत्रांचे व्यवस्थित वर्गीकरण केले.

## २. चॅरिटी कमिशनरकडे कार्यकारिणी व विश्वस्त मंडळाची नोंद

१९७१ नंतर चॅरिटी कमिशनरच्या ऑफिसमध्ये ट्रस्टच्या नावांच्या कसल्याही नोंदी नाहीत. या कार्यकारिणीने कार्यकारी मंडळ व विश्वस्त मंडळाच्या नावांची नोंद वरील कार्यालयातील रेकॉर्डला नोंदवली.

## ३. आळंदी प्लॉट

आळंदीच्या देणगी प्लॉट बद्दल काही कारवाई झालेली नव्हती. या कार्यकारिणीने ७/१२ चे उतारे व इतर कागदपत्रे मिळविलेली आहेत व प्लॉट लवकरच ट्रस्टच्या नांवे करून घेण्यात येईल. तसेच कुंपण घालून धर्मशाळा, वसतीगृह वगैरे काही करता येईल का याचा विचार चालू आहे.

## ४. मंगल कार्यालय

स्वारगेटच्या सहस्रार्जुन भवनातील कार्यालयाचे १९७७ ते ऑगस्ट १९९२ पर्यंत एकूण **पंधरा वर्षांत** रुपये ७६,८७६.५० उत्पन्न झाले. या कार्यकारिणीने ताबा घेतल्यानंतर सप्टेंबर ९२ ते मार्च ९३ अखेर रुपये ३४,२७३.०० उत्पन्न मिळविले. हे उत्पन्न **फक्त सात महिन्यांचे आहे.**

## ५. होर्डींग (जाहिरातींचे बोर्ड)

स्वारगेटच्या जागेतील आधीच्या होर्डींगच्या (जाहिरातीचे बोर्ड) भाड्याचे उत्पन्न फारच मर्यादित होते. बी. के. नाईक या कंपनीचा बोर्ड अनेक वर्षे फक्त रुपये ७००/- दरसाल या भाड्याने दिला होता. या कार्यकारिणीने त्याच बोर्डाचे बाजारभावाप्रमाणे दरसाल रु.१०,०००/- भाडे घेतले. या एकाच बोर्डमागे संस्थेस दरसाल रु.९३००/- उत्पन्न वाढले. अनेक वर्ष भाडेवाढ न केल्यामुळे संस्थेचे बरेच उत्पन्न बुडाले व नुकसान झाले. संस्थेच्या मुख्य इमारतीवर असलेल्या इलेक्ट्रॉनिक बोर्डाचे जुलै १९८८ ते जून १९९३ या कालावधीत करारामुळे फक्त दरमहा रुपये १,००० भाडे येत होते. खरं तर करार करताना देखील त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणे दरमहा रुपये ३,०००/- भाडे असावयास हवे होते. या कार्यकरिणीने ही जागा दुसऱ्या जाहिरातदारास भाड्याने देऊन दरमहा रुपये ३५००/- उत्पन्न सुरु केले. **आधी सर्व बोर्डांचे मिळून दरवर्षी फक्त रुपये १९,१००/- उत्पन्न संस्थेस मिळत होते. या कार्यकारिणीने नवीन कोटेशन मागवून ३ वर्षांचे करार केले.**

पहिल्या वर्षी भाड्याचे उत्पन्न रुपये **१,७५,२५०/- इतके केले.** पैकी पहिल्या ६ महिन्यांचे रुपये ८४,२९२/- संस्थेकडे जमा झालेले आहेत. पुढील ६ महिन्यांचे भाडे ८७,६२५/- रुपये संस्थेकडे जमा होईल. त्यापुढील प्रत्येक वर्षाला १०% भाडेवाढ राहील. म्हणजे १ वर्षानंतर रुपये १७,५२५/- रुपयांची वाढ होऊन वर्षाचे एकूण भाडे रुपये १,९२,७७५/- एवढे असेल. व तिसऱ्या वर्षी १०% प्रमाणे रुपये १९,२७७.५० वाढ होऊन तिसऱ्या वर्षीचे एकूण भाडे रुपये २,१२,०५२.५० होईल. कार्यकारिणीने शिस्तबद्ध व व्यवहारी दृष्टीकोन ठेवल्यामुळे संस्थेला एवढी मोठी रक्कम भाड्याद्वारे मिळत आहे. अशा प्रकारे ३ वर्षात निव्वळ होर्डींगच्या भाड्यापोटी संस्थेस रुपये ५,८०,०७७=५० (रुपये पाच लाख ऐंशी हजार सत्याहत्तर पैसे पन्नास) उत्पन्न मिळणार आहे.

| • फक्त ३ वर्षात जाहिरात बोर्डाचे मिळणारे उत्पन्न • | | | |
|---|---|---|---|
| पहिले वर्ष | — | रुपये | १,७५,२५०=०० |
| दुसरे वर्ष | — | रुपये | १,९२,७७५=०० |
| तिसरे वर्ष | — | रुपये | २,१२,०५२=५० |
| एकूण उत्पन्न | — | रुपये | ५,८०,०७७=५० |
| (रुपये पाच लाख ऐंशी हजार सत्याहत्तर पैसे पन्नास फक्त) | | | |

हे करार करताना सर्व प्रकारची दक्षता घेतलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थेस काहीही खर्च न करता हे उत्पन्न मिळणार आहे. संस्थेच्या आजवरच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळण्याची ही पहिलीच वेळ असेल. **ही आकडेवारी पाहता या आधीच्या काळात संस्थेचे कितीतरी लाखांचे उत्पन्न बुडाले.** आणखी काही होर्डींग्ज लावून उत्पन्न वाढविता येईल का याचा कार्याकारिणी विचार करीत आहे.

## ६. लोखंडी फाटक

इतकी वर्षे स्वारगेटच्या जागेस फाटक नसल्यामुळे त्या जागेचा वापर सार्वजनिक जागेसारखा होत असे. सायकली, स्कूटर व मोटारगाड्या तेथे ठेवल्या जात व त्याचे उत्पन्न भलतेच कोणीतरी घेत असे. जिन्याखालील पॅसेजचा व देवी मंदिराचा गैर प्रकारासाठी उपयोग होत होता. पॅसेजचे दोन्ही दरवाजे बंद करून त्याला आळा घातला. त्याच प्रमाणे लोखंडी फाटक बसवून गैर वाहनांना प्रवेश थांबविला.

## ७. श्री सहस्रार्जुन जयंती

अनेक वर्षे श्री सहस्रार्जुन जयंती निमित्त मिरवणूक निघाली नव्हती. या कार्यकारिणीने भव्य मिरवणूक काढून काही प्रमाणात समाज जागृती निर्माण केली. श्री सहस्रार्जुन जयंती दिवशी स्वारगेट येथील जागेत जेवणाचा कार्यक्रम होत असे. त्यास बंदिस्तपणा नसे. बाहेरचे अनेक लोक यामध्ये घुसत. कसलीही शिस्त नसे. लोकांना व्यवस्थित जेवता येत नसे. एकेका जेवणाराच्या खुर्चीमागे दोन-तीन लोक जेवणाचा नंबर केव्हा येईल याची वाट पहात उभे रहात. या कार्यकारिणीने नोव्हेंबर १९९२ च्या जयंतीला भव्य व बंदिस्त मांडव घातला.

मांडवाचे 'प्रतिक्षा कक्ष', 'भोजन कक्ष' व वरील हॉल मध्ये 'विश्रांती कक्ष' असे वेगवेगळे बंदिस्त विभाग तयार केले. त्याच प्रमाणे भोजन कक्षातील क्षमतेप्रमाणे त्या-त्या क्षमतेचे वेगवेगळ्या रंगाचे कार्ड तयार करून कार्डच्या रंगाप्रमाणे गटागटाने सर्वांना भोजन कक्षात सोडण्यात आले. अशा प्रकारे शिस्तीचे कठोरपणे पालन करून व कसलाही अपवाद होऊ न देता जेवणे व्यवस्थित पार पडली. प्रथमच अशा प्रकारची पद्धत अवलंबल्यामुळे काही समाज बंधु-भगिनीं गोंधळले गेले तर काही रागावले. परंतु एक मात्र निश्चित की जेवणे झाल्यानंतर सर्वजण समाधानी होते. जेवणास मोठ्या संख्येने हजर राहून समाज-बंधु-भगिनींनी उत्तम प्रतिसाद दिला. गैर शिस्तिमुळे बरेच बंधुभगिनी येत नसत. नोव्हेंबर ९२ च्या कार्याक्रमास त्यांची उपस्थिती वाढली. येत्या श्री सहस्रार्जुन जयंतीला तर आणखीन प्रचंड प्रतिसाद मिळेल याची कार्यकारिणीस खात्री आहे.

## ८. सार्वजनिक कार्यक्रमातून एकजूटीचा प्रयत्न

माजी ट्रस्टींच्या काळात २६ जानेवारी झेंडावंदन, रंगपंचमी, रामनवमी, गोकुळ अष्टमी, १५ ऑगस्टचे झेंडावंदन इ. कार्यक्रम होत नव्हते. या कार्यकारिणीने वरील कार्यक्रम साजरे करण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे (दर सहा महिन्यांतून) कार्यकारिणी, पतपेढी, व इतर उपसंस्था यांची किमान एक तरी बैठक घेण्याचे ठरले.

वरील सर्व कार्यक्रम व उपक्रम करण्यामागे हेतू हाच की समाजाच्या स्वारगेट येथील जागेचा समाज-बांधवांकडून जास्तीत जास्त वापर व्हावा व समाज बंधु-भगिनींनी जास्तीत जास्त वेळा एकत्र यावे, संपर्क वाढावा व आपल्या समाजातील विस्कळीतपणा नाहीसा होऊन एकजूट वाढावी.

या कार्यकारिणीने वरील उद्दीष्टे काही प्रमाणात साध्य केली आहेत हे सांगण्यास आम्हास आनंद होतो.

## ९. भाडेकऱ्यांविरुद्ध कारवाई

स्वारगेटच्या जागेतील काही भाडेकरूंनी भाडे कराराचे उल्लंघन केले तरीही माजी ट्रस्टींनी त्यांना वकीलांमार्फत नोटीस देण्यापलिकडे काहीही केले नाही. या कार्यकारिणीने गिरिधरलाल डायाराम शर्मा या भाडेकऱ्यांविरुद्ध व एका अनधिकृत लाकडी खोक्याविरुद्ध अशा दोन केसेस कोर्टात दाखल करुन प्रत्यक्ष कारवाईस सुरुवात केलेली आहे.

५७६ गुरुवार पेठ येथील जागा भाड्याने देऊन, स्वारगेट येथील तिसऱ्या मजल्यावरील कार्यालय भाड्याने देऊन व जमिनीवरील मांडव भाड्याने देऊन, होर्डींग (जाहीरात बोर्ड) मधील भाड्यात प्रचंड वाढ करून संस्थेचे उत्पन्न वाढविले आहे. संस्थेचे उत्पन्न आणखी वाढावे यासाठी कार्यकारिणीचा काही योजनांवर विचार चालू आहे.

* * *

# जाहीरनाम्याची पूर्तता

प्रगती पॅनेलने आपल्या पुस्तिकेत दिलेल्या जाहीरनाम्यातील खालील काही बाबींची पूर्तता केलेली आहे.

१. स्वारगेट येथील जागेत सुसज्ज मंगल कार्यालय सुरु केले.
२. महिला मंडळ स्थापन करून त्यांच्या कार्यास चालना दिली.
३. वधु-वर सूचक मंडळ स्थापन केले.
४. संस्थेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ केली.

जाहीरनाम्यातील बऱ्याच कलमांची पूर्तता व्हावयाची आहे. सभासदांच्या पाठींब्याने व मदतीने हे टप्पे देखील गाठणे अशक्य नाही याचा कार्यकारिणीला विश्वास आहे.

# भविष्यकालीन योजना

## भव्य प्रकल्प

१. स्वारगेट जागेतील तिन्ही मंदिरातील देवतांची एकाच जागी प्रतिष्ठापना करणे, ज्यामुळे नियोजित इमारतीच्या कच्या योजनेस सर्वसाधारण सभेची संमती घेऊन कार्यकारिणीला पुढील वाटचाल करता येईल. ह्या प्रकल्पातील एक मजला एखाद्या बँकेस भाड्याने देऊन व बँकेकडून बांधकामासाठी आर्थिक सहाय्य घेऊन हा प्रकल्प उभा करणे शक्य आहे.

या प्रकल्पात खालील सोयी करता येतील.

*१. अंडरग्राऊंड पार्किंग* — *२. बँकेसाठी एक मजला*
*३. ट्रस्टचे मुख्य कार्यालय* — *४. सुसज्ज सभागृह व मंगल कार्यालय*
*५. महिला मंडळ कार्यालय* — *६. पतपेढी कार्यालय*
*७. युवक संघटना कार्यालय* — *८. व्यायाम शाळा*
*९. शिक्षण मंडळ कार्यालय* — *१०. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह*
*११. व्यवसाय शिक्षण केंद्र* — *१२. बालवाडी*
*१३. धार्मिक प्रवचने, भजने इ. साठी हॉल* — *१४. शक्य झाल्यास रोड साईडला दुकाने*
*१५. शक्य झाल्यास ऑफिसेस साठी जागा* — *१६. वाचनालय व अभ्यासिका*

या प्रकल्पास बराच कालावधी लागेल. काही कायद्याच्या बाबी आड येतील. त्यातून मार्ग काढून हा प्रकल्प उभा करावयाचा आहे. सर्व समाज बंधु-भगिनींनी एकजुटीने या प्रकल्पामागे

उभे रहावे अशी आम्ही नम्र विनंती करतो.

२. कै. श्रीमती पुष्पावतीबाई सखारामसा काटवे यांनी इच्छापत्रानुसार संस्थेला देणगी दिलेला आळंदी येथील प्लॉट संस्थेच्या मालकीचा होताच त्यावर समाजासाठी धर्मशाळा बांधण्याची योजना आहे.

३. ५७६ गुरुवार पेठ, येथील जुन्या इमारतीचे नुतनीकरण करून किंवा संपूर्ण नवीन बांधून तेथे देखील एक छोटे सुसज्ञ मंगल कार्यालय उभे करण्याचा कार्यकारिणीचा विचार आहे.

## ● कार्यकारिणीचे मनोगत ●

१. पुणे शहराच्या प्रचंड विस्तारामुळे सर्व समाज बंधु दूरवर पांगले गेले आहेत. कात्रज, कोंढवे, आंबेगाव या परिसराजवळ काही एकर जमीन घेऊन त्याचे छोटे प्लॉट पाडून ते जर सवलतीच्या दराने समाज-बांधवांस देता आले तर त्यास उत्तम प्रतिसाद तर मिळेलच परंतू एक छोटीशी **'सहस्त्रार्जुन नगरी'** उभी राहून बराच समाज कायम स्वरुपी एकत्र राहील.

या क्षेत्रातील अनुभवी समाजबांधवांनी व सधन समाजबांधवांनी एकत्र येऊन प्रयत्न केले तर अशा प्रकारचा 'सहस्त्रार्जुन नगरी' चा प्रकल्प कार्यान्वीत होऊ शकेल.

२. संस्थेच्या स्वतःच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा असाव्यात, मुलामुलींना याचा निश्चितच फायदा होईल.

३. संस्थेची स्वतःची इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्युट सारखी एखादी संस्था असावी. ठराविक चाकोरी बाहेर पडून या केंद्राद्वारे समाजाच्या तरूण तरुणींना हे व्यवसाय शिक्षण मिळेल. शिक्षणाचे एक वेगळेच क्षितीज समाजाच्या विद्यार्थ्यांना प्राप्त होईल.

४. श्री सहस्त्रार्जुन पतपेढीचे शक्य झाल्यास बँकेत रुपांतर व्हावे. ठेवी व कर्जे वाटपाद्वारे अनेक समाज बांधवांना मदत करुन समाजाची आर्थिक स्थिती सुधारता येईल. याच शहरातील काही समाजांच्या बँकांनी असे केल्यामुळे त्या समाजांची आर्थिक उन्नती झाली आहे.

५. पुण्यातील वधुवर सूचक मंडळाची व्याप्ती वाढावी. सबंध महाराष्ट्रातून या केंद्राकडे वधु-वरांची नोंदणी व्हावी. कॉम्प्युटरच्या मदतीने या सर्व माहितीचे वर्गीकरण करून कोणासही हवी ती माहिती अल्प वेळेत छापून दिली जाण्याची सोय करावी. वधु-वर मेळावे भरवावेत. याच वधु-वर सूचक केंद्रामार्फत सामुहिक लग्ने व सामुदायिक मुंजी व्हाव्यात.

६. समाजाच्या आर्थिक दुर्बलांसाठी एखाद्या कायम स्वरुपी कोषाची स्थापना करून खऱ्या खुऱ्या गरजवंतांना त्यामार्फत मदत करावी.

७. समाजातील काही अनिष्ट प्रथा व रुढी नष्ट व्हाव्यात यासाठी पुणे समाजाकडून

प्रयत्न व्हावेत उदा. आहेर प्रथा, वस्तू भेट देणे, हुंडा देणे-घेणे इ. प्रथा बंद व्हाव्यात.

८. गदग येथील विद्यावर्धिनी संघाप्रमाणे पुणे समाजाचे शिक्षण मंडळ आर्थिक दृष्ट्या बलवान व्हावे. अशा सधन शिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी व उच्च शिक्षणासाठी मदत दिली जावी. अतिशय सवलतीच्या दरात अथवा व्याजरहित कर्जे दिली जावीत.

या निवेदनाचा शेवट करताना एवढे नमूद करावेसे वाटते की ट्रस्टचे माजी अध्यक्ष श्री. दत्तात्रयसा वाळवेकर व ट्रस्टचे माजी कार्यवाह श्री. रमाकांतसा खोडे यांनी ट्रस्टचा कारभार व ताबा हस्तांतर करताना या कार्यकारिणीकडे फक्त रु.३३,०००/- सोपविले. १९७७ ते १९९२ या कालाची ही त्यांची बचत. याच त्यांच्या १५ वर्षांच्या काळात ट्रस्टचे एकूण उत्पन्न रु.१४,३४,८८३=३६ (सरासरी रुपये ९५,६५८=८६ दरवर्षी) इतके होते. या कार्यकारिणीच्या अंमलात सप्टेंबर १९९२ ते सप्टेंबर १९९३ या कालात एकूण उत्पन्न रु.२६०,६४३=७० इतके झाले. या तुलनेवरून ट्रस्टची अधोगती वा प्रगती कशी झाली हे सहज लक्षात येईल.

सर्व समाज बंधु-भगिनींची त्यांच्या आतापर्यंतच्या सहकार्याबद्दल कार्यकारिणी अतिशय आभारी आहे. आपण आम्हावर जो विश्वास दाखविला तो आणखीन दृढ करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत.

आपले नम्र,

**कार्यकारिणी**

**श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे.**

# घटना दुरुस्ती संबंधी स्पष्टीकरण

१. दि. १.७.१९९२ रोजीच्या सर्व साधारण सभेने अद्ययावत घटना संमत केली. कार्यकारिणीच्या १ वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष कार्य करताना या अद्ययावत घटनेतील काही त्रुटी लक्षात आल्या. त्या खालील प्रमाणे. घटनेतील पान क्र.३ वर 'संस्थेच्या उत्पन्नाचे विनियोग' या कलमात खालील तरतूद दिलेली आहे.

''संस्थेच्या कार्यालयाचा व इतर दैनंदिन खर्च वजा जाता राहिलेल्या उत्पन्नाचा विनियोग खालील प्रमाणे करता येईल.

शेकडा २५% कायम निधीकडे वर्ग करण्यात यावा.
शेकडा १५% धार्मिक बाबींसाठी खर्च करणे
शेकडा २५% शैक्षणिक
शेकडा १५% औद्योगिक
शेकडा ५% वैद्यकीय
शेकडा ५% भूतदयावादी
शेकडा १०% इतर बाबींसाठी खर्च करणे

वरील खर्चाची बंधने कायम ठेऊन वरील एका बाबींकडून दुसऱ्या बाबींकडे कार्यकारिणीस २५% रक्कम वर्ग करता येईल.''

वरील नियमाचे पालन करणे व्यावहारिक दृष्ट्या कठीण आहे. त्याचप्रमाणे तसे हिशोब ठेवणे व त्या त्या टक्केवारी प्रमाणे त्या त्या बाबींसाठी खर्च करणे हे व्यावहारिक दृष्ट्या अतिशय कठीण काम आहे. ही टक्केवारी काढून टाकण्यास व कार्यकारिणीला योग्य वाटेल त्या त्या बाबींवर खर्च करण्याचा अधिकार कार्यकारिणीस देण्यास समाज बांधवांनी संमती देऊन हा घटना दुरुस्तीचा ठराव संमत करावा अशी आम्ही समाज बंधु-भगिनींना नम्र विनंती करतो.

२. वरील घटनेच्याच पान क्र. ४ वर 'सभासद व सभासदत्व' या कलमाखाली पोट कलम २ व पोट कलम ५ असे आहेत :–

पोट कलम २ – ''सभासदत्व मिळविण्यासाठी संस्थेच्या सभासदत्वाचा छापील फॉर्म भरून व त्यावर पदावरील दोन सभासदांची सभासदत्वाबद्दलची लेखी शिफारस घेऊन व वार्षिक वर्गणी १ रुपया भरून वरील फॉर्म संस्थेच्या कार्यवाहाकडे पाठविला पाहिजे. वर्गणी शिवाय आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.''

पोट कलम ५ – ''एकदाच ५१ रुपये भरून व नियमानुसार सभासदत्वाचा अर्ज भरून व स्विकृती मिळवून आजीव सभासद होता येईल. अशा सभासदास सभासदत्वाचे सर्व अधिकार प्राप्त होतील.''

या कलमांचे पालन करण्याचे ठरविल्यास दरवर्षी सभासद वर्गणी गोळा करावी लागेल.

घटनेतील नियमाप्रमाणे ३ वर्षे जर सभासद वर्गणी भरली गेली नाही तर त्या व्यक्तिंचे सभासदत्व आपोआपच रद्द होते. आपल्या समाजाच्या इतिहासात असा पुरावा आहे की निव्वळ वर्गणी ३ वर्षात वेळेवर न आल्यामुळे १९७७ ते १९९२ या कालावधीत सर्व सभासदांचे सभासदत्व रद्द झाले होते. माजी अध्यक्ष व ट्रस्टी यांनी देखील या नियमांचा भंग केल्यामुळे खरेतर त्यांचे देखील सभासदत्व संपले होते. तरीही त्यांनी १५ वर्षे कारभार केला, हा संशोधनाचा विषय ठरावा. निव्वळ सभासद नोंदणी नसल्यामुळे निवडणूक वेळेवर घेण्याचे टाळले गेले. एवढेच नव्हे तर निवडणूकच घेतली नाही. अशा तऱ्हेने १५ वर्षे संस्थेचा कारभार बेकायदेशीररित्या ठराविक व्यक्तिंच्या हातात होता. भविष्य काळात याची पुनरावृत्ती होऊ नये असे या कार्यकारिणीस वाटते. त्यावर एक उपाय म्हणून सभासद नोंदणीच्या वेळची वर्गणी रद्द करून टाकायची, आतापर्यंत जे सभासद नोंदले गेले ते सर्व आजीव सभासद म्हणून जाहीर करायचे व ज्या समाज-बंधु-भगिनींची अजूनही सभासद नोंदणी झालेली नसेल त्यांनी फक्त नियमाप्रमाणे सभासदत्वाचा ठराविक फॉर्म भरला की त्यांना देखील आजीव सभासदत्व द्यावयाचे. ज्या समाज बांधवांना सभासद नोंदणीच्या वेळी काही ऐच्छीक रक्कम द्यावयाची असल्यास तशी ते देऊ शकतील. हा नियम जर संमत झाला तर लोकशाही मार्गाने निवडणूका होण्यास कधीच खंड पडणार नाही. सभासद वर्गणी हा समाजाच्या उत्पन्नाचा भाग नाही. उलट ती वर्गणी गोळा करणे हे वर्गणी पेक्षाही जास्त खर्चाचे, त्रासाचे व वेळ खाणारे काम आहे.

३. याच घटनेच्या पान क्र ५ वर 'सभासदत्वाची अपात्रता' या कलमाखाली पोट कलम १ असे आहे : ''ज्या व्यक्तिकडे ३ वर्षांहून अधिक सभासद वर्गणी थकली असेल त्याचे सभासदत्व रद्द समजण्यात येईल. पुन्हा सभासदत्व चालू करण्यासाठी थकलेली सर्व वर्गणी भरावी लागेल, किंवा नवीन सभासदत्व मिळविण्यासाठी नियमानुसार अर्ज करून कार्यकारिणीकडून सभासदत्वासाठी स्विकृती मिळवावी लागेल. अशा प्रकारे किती वेळा सभासदत्व मिळेल या बाबतचा कार्यकारिणीचा निर्णय अंतिम राहील.''

वरील स्पष्टीकरणानुसार हा नियम देखील रद्द करण्याचा ठराव सभासदांनी संमत करावा अशी नम्र विनंती आहे.

४. याच घटनेच्या पान क्र.७ वर 'कार्यकारिणीची निवड' या कलमाखालील उप कलम २ असे आहे : ''कार्यकारिणीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, व कार्यवाह तिघांची पदसिद्ध समिति, पुढील वर्षाच्या निवडणूकीचे काम करील. अशी समिति पदसिद्ध होणे शक्य नसल्यास कार्यकरिणी सदरहू कामाकरिता एक सभा बोलावून त्यांत तीन जणांची एक निवडणूक समिति नेमील. निवडणूक पार पाडावयाचे सर्व अधिकार त्या निवडणूक समितीस राहतील.''

निवडणूक समितीत कार्यकारिणीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यवाह असतील. परंतू निवडणूकीस पुन्हा उभे राहाण्यास ते पात्र असतील. निव्वळ निवडणूक समितीमध्ये असल्यामुळे वरील तिघांचा निवडणूक लढविण्याचा हक्क नष्ट होऊ नये म्हणून या दुरुस्तीची आवश्यकता आहे. सदरील दुरुस्ती ठराव सभासदांनी संमत करावा अशी नम्र विनंती आहे.

## ● पंच हक्क ●

१. महाराष्ट्र प्रांतीय सभेच्या १० व्या बैठकीत संमत झालेल्या ठरावानुसार व मे १९९३ रोजी प्रकाशित झालेल्या सहस्रार्जुन वाणीतील मजकुराप्रमाणे पंचांचे लग्न हक्क इ. खालील प्रमाणे राहतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | उपनयन संस्कार | — | प्रत्येक बटुमागे | रु. ११ |
| २. | साखरपुडा | — | वधू व वराकडून | रु. ५१ प्रत्येकी |
| ३. | विवाह | — | वधू व वराकडून | रु. ५१ प्रत्येकी |
| ४. | गंधर्व लग्न (प्रेमविवाह) | — | वराकडून | रु. ५१ |
| ५. | दत्तक विधान | — | दत्तक घेणाऱ्याकडून | रु. १२१ |
| ६. | साखरपुडा समाप्तीसाठी दोषी पक्षाकडून | | | रु. ५१ |
| ७. | विवाह किंवा गंधर्व विवाह समाप्तीसाठी दोषी पक्षाकडून | | | रु. १०१ |
| ८. | वरील विषयांचे तक्रार व इतर तक्रार अर्ज दाखल करून घेण्यासाठी शुल्क | | | रु. २५ |

## ● .कार्यालय भाडे ●

| | समाज बांधवांसाठी | | इतरांसाठी | |
|---|---|---|---|---|
| | दर रु. | अनामत रु. | दर रु. | अनामत रु. |
| **सहस्रार्जुन भवन** | | | | |
| १. लग्न | १२०० | ५०० | २१०० | १००० |
| २. साखरपुडा ६ तास जेवणासह | ५०० | ५०० | ७५० | १००० |
| ३. साखरपुडा जेवणाशिवाय | २५० | २५० | ५०० | ५०० |
| ४. बारसे जेवणासह | ५०० | ५०० | ७५० | १००० |
| ५. सभा संमेलन जेवणाशिवाय ४ तास | २०० | ३०० | ४०० | ५०० |
| ६. मंडप संपूर्ण | २००० | ५०० | ३००० | १००० |
| ७. मंडप संपूर्ण व कार्यालय | ३००० | ५०० | ५००० | १००० |
| ८. सभा संमेलन संपूर्ण दिवस | — | | परिस्थितीनुसार | — |
| **५७६ गुरुवार पेठ** | ५१ | २०० | २५१ | ३०० |

वरील दरांची फेररचना करण्याचा अधिकार कार्यकारिणीला राहील.

- ज्या समाज बांधवांची अद्याप सभासद नोंदणी झालेली नसेल त्यांनी मुख्य कार्यालयात (कार्यालयीन वेळेत) संपर्क साधून सभासद नोंदणी करावी.
- शिक्षण मंडळाने सुरु केलेल्या "आजीवन सदस्य" नोंदणी मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपणही रु.५००/- भरून "आजीवन सदस्य" होऊन शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक कार्यास हातभार लावून समाजातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुलभ करावा.
- श्री सहस्रार्जुन जयंती कार्यक्रमाच्या दिवशी मांडवावरील जाहिराती करीता समाजातील व्यापारी बांधवांनी मुख्य कार्यालयात संपर्क साधावा व आपली जाहिरातीची जागा लवकरात लवकर निश्चित करावी.

*Rajan M. Shah*
B.A., B.Com., F.C.A.
Chartered Accountant
'Siddarth',
635/84, Vijayanagar Colony,
Pune 411 030.

Phone 440 261

## AUDIT REPORT FOR THE YEAR ENDED 31.03.1993

Examined and found correct as per books of accounts, vouchers and information given to me during the course of my audit.

**R.M. Shah**
*Chartered Accountant*

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

(रजि. नं. अे–१६)

## ३१ मार्च १९९३ ला संपणाऱ्या वर्षाकरिता आय-व्यय लेखा

| व्यय | रुपये | रुपये | आय | रुपये | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| मालमत्तेसंबंधी खर्च | | | भाडे वसूल | | १,२५,५४०=०० |
| स्थावर कर, कर, सेस | ८१८=०० | | फिक्स्ड डिपॉझिटवर व्याज येणे | | ५१,०१४=०० |
| दुरुस्ती व व्यवस्था | ५८,३९१=९० | | बँक अकाऊंटवर व्याज वसूल | | ४१८=०० |
| विमा | १०,०२०=०० | ६९,२२९=०० | पतपेढीवर व्याज वसूल | | १,८००=०० |
| कोर्ट खर्च | | ५००=०० | लाभांश (डिव्हीडंड) | | १२,५४५=०० |
| डोनेशन | | २,५०१=०० | इतर साधनांपासून झालेले उत्पन्न | | |
| किरकोळ खर्च (लिस्ट ए प्रमाणे) | ७४,३८३=७५ | ७४,३८३=७५ | किरकोळ वसूली | २,४१२=१० | |
| अवमूल्यन | | १०,५४१=३५ | लग्न हक्क | ३,०३६=०० | |
| ट्रस्टच्या उद्देशावर केलेला खर्च : | | | देवापूढील दानपेटीतील जमा | ५,९५३=०० | |
| (अ) धार्मिक | ३६,८४६=२० | ३६,८४६=२० | निवडणूक जमा | १,१३०=०० | |
| अधिक रक्कम स्थिती– | | | सभासदत्व नोंदणी शुल्क | १७२=६७ | |
| विवरणास स्थानांतरित | | १०,९३१=९७ | वर्गणी | १,७१४=०० | १३,६१७=७७ |
| एकूण | | २,०४,९३५=१७ | एकूण | | २,०४,९३५=१७ |

डॉ. प्रकाश भु. त्रिमल
अध्यक्ष

श्री. अशोकसा. ल. रंगापूरे
कार्यवाह

श्री. प्रभाकर ज. बाकळे
खजिनदार

## श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

(रजि. नं. अे-१६)

### ३१ मार्च १९९३ ला संपणाऱ्या वर्षाचे स्थिती विवरण

| निधी आणि देयता | रुपये | रुपये |
|---|---|---|
| ट्रस्ट फंड किंवा स्थायी फंड | | |
| मागील स्थिती विवरणाप्रमाणे असलेली शिल्लक | १,९४,६२६=४१ | |
| (+ )आजीवन सभासद फी | ५,१०६=०० | १,९९,७३२=४१ |
| देयता : | | |
| खर्चासाठी | ९,३५०=०० | |
| आगाऊ रकमाबाबत | १,१८१=२० | |
| वाचनालय डिपॉझिट | ७७५=०० | |
| आगाऊ मिळालेले सभासद शुल्क | ३४५=३३ | |
| तातुरते ओव्हरड्राफ्ट (बँक) | ३५६=१९ | १२,००७=७२ |
| आयव्यय – लेखा : | | |
| मागील स्थिती विवरणाप्रमाणे असलेली शिल्लक | ३,५७,७९९=०१ | |
| (+) आय-व्यय पत्रकात दाखविल्याप्रमाणे अधिक रक्कम | १०,९३२=९२ | ३,६८,७३१=९८ |
| एकूण | | ५,८०,४७२=११ |

| मालमत्ता | रुपये | रुपये |
|---|---|---|
| स्थावर मालमिळकत | | |
| इमारत | १,४८,८३३=३२ | |
| (–) घसारा | ७,४४१=६६ | १,४१,३९१=६६ |
| मंदिर | ८,८२९=१७ | |
| (–) घसारा | ४४१=४६ | ८,३८७=८१ |
| भांडी | १०,५६३=०७ | |
| (–) घसारा | १,०५६=३१ | ९,५०६=७६ |
| फर्निचर | ४,६८९=४८ | |
| (–) घसारा | ४६८=९५ | ४,२२०=५३ |
| डेड स्टॉक | ११,३२९=८७ | |
| (–) घसारा | १,१३२=९७ | १०,१९६=९० |
| टेलिफोन डिपॉझिट | | २,०००=०० |
| फिक्स्ड डिपॉझिट | | ३,८८,१६४=०० |
| भाडे उत्पन्न येणे बाकी | ७,५३८=७५ | ७,५३८=७५ |
| रोख आणि बँकेतील शिल्लक | ९,०६५=८० | ९,०६५=८० |
| एकूण | | ५,८०,४७२=११ |

डॉ. प्रकाश भु. त्रिमल
अध्यक्ष

श्री. अशोकसा. ल. रंगापूरे
कार्यवाह

श्री. प्रभाकर ज. बाकळे
खंजिनदार

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

(रजि. नं. अे–१६)

## ३१ मार्च १९९३ ला संपणाऱ्या वर्षाचे स्थिती विवरण

### लिस्ट 'ए' – किरकोळ खर्च विवरण

| अ.क्र. | विवरण | ... | रुपये |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयीन खर्च | ... | ३,२४३=६० |
| २. | टेलिफोन खर्च | ... | २,२०५=२५ |
| ३. | कायदेविषयक सल्ला खर्च | ... | ७५०=०० |
| ४. | ऑडिट फी | ... | ४२३=०० |
| ५. | किरकोळ खर्च | ... | १७,६६८=४५ |
| ६. | वीज खर्च | ... | ३,७५०=०० |
| ७. | वीज उपकरणे | ... | १,५९९=७५ |
| ८. | छपाई व स्टेशनरी | ... | ६,६१६=५० |
| ९. | वाहतुक व हमाली | ... | १,०४२=५० |
| १०. | टपाल हशील | ... | १,०४८=५० |
| ११. | निवडणूक खर्च | ... | २,७७४=५० |
| १२. | वाचनालय खर्च | ... | ७३३=९५ |
| १३. | सभाखर्च | ... | ३,८७०=५० |
| १४. | पाणी कर इ. | ... | ४२५=०० |
| १५. | अकाऊंटंट फी | ... | २,०००=०० |
| १६. | जाहिरात खर्च | ... | ११५=४० |
| १७. | बँक चार्जेस | ... | ८=५० |
| १८. | साफसफाई खर्च | ... | ४,००३=०० |
| १९. | एम्ब्रॉयडरी खर्च | ... | ४७०=०० |
| २०. | महाराष्ट्र प्रांतिक अधिवेशन | ... | ५,९२७=१० |
| २१. | मांडव खर्च | ... | ११,११०=०० |
| २२. | मॅटस् इ. | ... | ४,७७८=०० |
| | एकूण | ... | ७४,३८३=७५ |

डॉ. प्रकाश भु. त्रिमल
अध्यक्ष

श्री. अशोकसा. ल. रंगापूरे
कार्यवाह

श्री. प्रभाकर ज. बाकळे
खजिनदार

# पुढील वर्षातील कार्यक्रम

| दिनांक / तिथी | कार्यक्रम | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १६.१०.१९९३ | घटस्थापना | सायं. ६.०० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| १७.१०.१९९३ ते २४.१०.९३ | दररोज देवीची आरती | स. ८.३०<br>रा. ८.३० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट<br>सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| २९.१०.१९९३ | कोजागिरी पौर्णिमा<br>दुग्ध वाटप | सायं. ५.००<br>ते १०.०० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| २०.११.१९९३ | **श्री सहस्रार्जुन जयंती**<br>मिरवणूक (कार्यालय ते स्वारगेट)<br>भोजन समारंभ | <br>स. ९.००<br>स. १२ ते ५ | <br>५७६ गुरुवार पेठ,<br>सहस्रार्जुन भवन स्वारगेट |
| २४.११.१९९३ | श्री पर्वतीगिरीमहाराज उत्सव | स. १०.०० | श्री विष्णु मंदिर, स्वारगेट |
| २६.०१.१९९४ | २६ जानेवारी–झेंडावंदन<br>महिला मंडळ हळदीकुंकू | स. ८.००<br>सा. ५ ते ८ | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट<br>सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| ३१.०४.१९९४ | रंगपंचमी | दु. १.०० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| ३१.०४.१९९४ | गुढीपाढवा-<br>महिलामंडळ हळदीकुंकू | सा ५ ते ८ | सहस्रार्जुन भवन स्वारगेट |
| चैत्र शु.९ | श्री रामनवमी | दु. १२.०० | श्री विष्णु मंदिर, स्वारगेट |
| चैत्र शु. पौर्णिमा | श्री हनुमान जयंती | स. ६.०० | श्री मारुती मंदिर, स्वारगेट |
| आषाढी पौर्णिमे नंतरचा पहिला मंगळवार | श्री दशमुखी देवीची सामुदायिक आरती | दु. २.०० | श्री दशमुखी देवी मंदिर, स्वारगेट. |
| श्रावण व. ८ | गोकूळ अष्टमी | रात्री१२.०० | श्री विष्णु मंदिर, स्वारगेट |
| १५.०८.१९९४ | झेंडावंदन | स. ८.०० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| श्रावण शु. पंचमी | नागपंचमी (महिलांसाठी) | सायं. ५.०० | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |
| श्रावण व.३० | श्री सुभाननाथमहाराज उत्सव | स. १०.०० | विष्णु मंदिर, स्वारगेट |
| श्रावण शेवट शुक्रवार | महिला मंडळ, हळदीकुंकू | सा. ५ ते ८ | सहस्रार्जुन भवन, स्वारगेट |

**टीप** : येत्या एक वर्षातील संस्थेतर्फे होणाऱ्या कार्यक्रमाचे वेळापत्रक एकदम देत आहोत. प्रत्येक कार्यक्रमाचे संस्थेतर्फे हेच निमंत्रण समजून समाज बंधु-भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने वरील प्रत्येक कार्यक्रमास हजर रहावे. वरील सर्व कार्यक्रमास उपस्थित राहताना सव समाज बंधु-भगिनींनी काटेकोरपणे वेळेचे पालन करणे अतिशय आवश्यक आहे.

बुक–पोस्ट

प्रति,

पीन कोड नं.

प्रेषक :
डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल
अध्यक्ष
श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे.

**प्रमुख कार्यालय**
५७६ गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२.
● वेळ ●
सकाळी ९॥ ते १०॥ सायं. ६॥ ते ७॥

**उप कार्यालय**
४९७, ४९९, ५०० घोरपडे पेठ, पुणे ४११ ०४२.
● वेळ ●
सकाळी ११ ते सायं. ५

मुद्रक : व्हीनस प्रिंटर्स, १४५२ कसबा पेठ, पुणे ४११ ०११. ✆ २६६२९